RPAD

87

PUNEMETROPOLIS

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत,आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे-४११०४४,
दूरध्वनी क्र.०२०-२७६५२९३४ Email : ad.pmrda@gmail.com

AD/लोकसेवा हक्क आयोग/ 1380 दिनांक :- 27/09/2023

प्रति,

सह सचिव,
नगर विकास विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई — ४०००३२.

**विषय** :-महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीबाबत..

**संदर्भ** :- १) सह सचिव, नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र. नविवि-२०२३/प्र.क्र.१८/नवि-२९ दि. १४/०९/२०२३.
२) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन आदेश क्र. एमआरडी-३३२२/१५४० / प्र.क्र.२०५/नवि-७ दि. २६/०७/२०२३.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे कार्यालयाकडून नागरीकांना देण्यात येणा-या सेवा व अधिसूचित करावयाच्या सेवांचे प्रस्ताव शासनास सादर करावेत. अधिसूचित लोकसेवांची सूची, कालमार्यादा, पदनिर्देशित /अपिलीय अधिकारी इ. माहिती कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावण्याची कार्यवाही तात्काळ करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करण्यात यावे असे कळविले आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन आदेशान्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील १० लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी अधिसूचित करण्यास मान्यता दिली आहे.

तथापि जमीन मालमत्ता विभागातील पदनिर्देशित अधिकारी यांचे पदनमात उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याऐवजी उप आयुक्त असा बदल करण्यासाठी व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ (सुधारीत २०२३) नुसार अग्निशमन विभागाकडील सुधारीत शुल्क आकारणे बाबत अनुसूची “अ” मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने शासनास दि. ०८/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी अधिसूचित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

सद्यस्थितीत, संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार प्राधिकरणातील १० लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित, प्रथम अपिलिय व व्दितीय अपिलीय अधिकारी याबाबत कार्यालयाच्या दर्शनी भागात नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे.

राहुल महिवाल (भा.प्र.से)
**महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,पुणे**

O/C

Scanned with CamScanner

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

**नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे — ४११ ०४४**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम — २०१५**

**विकास परवानगी विभाग**

**अनुसूची "अ"**

| अ.क्र | अधिसूचित करावयाच्या लोकसेवांचा तपशिल | आवश्यक कागदपत्र | शुल्काचे प्रकार व आकारणी | | लोकसेवा पुरविण्यासा-ठीची कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी पदनाम | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | | ५. | ६. | ७. | ८. |
| १ | अभिन्यास / इमारत बांधकाम परवानगी | १) विहीत नमुन्यातील अर्ज.<br>२) ७/१२ उतारा / मालकी हक्काच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे<br>३) मोजणी नकाशा<br>४) प्रस्तावित रेखांकन / बांधकाम नकाशे<br>५) आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे | छाननी शुल्क | प्राधिकरणाकरिता लागू दि.२८.१०.२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार आकारणी करण्यात येते. | ३० दिवस | सहायक नियोजनकार (सहायक नगर रचनाकार) | उपमहानगर नियोजनकार (नगर रचनाकार) | महानगर नियोजनकार |
| | | | विकास शुल्क | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४(अ) नुसार<br>(१)**रहिवास व शैक्षणिक वापर** — चालू वार्षिक बाजार मूल्य दराच्या ०.५%जमिनीकरीता व २% बांधकामाकरीता<br>(२) **औद्योगिक वापर** ( चालू वार्षिक बाजार मूल्य दराच्या ०.५% जमिनीकरीता व २% बांधकामाकरीता )* १.५<br>(३) **वाणिज्य वापर** - ( चालू वार्षिक बाजार मूल्य दराच्या ०.५% जमिनीकरीता व २% बांधकामाकरीता )* २ | | | | |



Scanned with CamScanner

... मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव ( नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.
९. संचालक, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, पुणे.
१०. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, मुंबई / नागपुर
११. महालेखापाल, (लेखापरिक्षा)-१/२, मुंबई/ नागपुर
१२. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१३. अभिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. उप सचिव ( नवि-१३), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. उप सचिव (नवि-७), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती (नवि-७).



Scanned with CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ६) आवश्यक हमीपत्र | कामगार कल्याण उपकर | शासन निर्णय क्र. बीसीए २००९/ प्र. क्र./ कामगार-७ अ, दि. १७.०६.२०१० नुसार प्रस्तावित बांधकाम क्षेत्राकरीता प्रति चौ.मी. बांधकाम दरानुसार येणा-या रक्कमेच्या १ % प्रमाणे | | | | |
| | | | अधिमूल्य आकारून देण्यात आलेले चटई क्षेत्र निर्देशांक | प्रस्तावित बांधकाम क्षेत्राकरीता चालू वार्षिक बाजार मूल्य दराच्या ३०% | | | | |
| | | | गावठाणापासून विवक्षित अंतरामध्ये अनुज्ञेय करावयाच्या रहिवास वापराचेअधिमूल्य ( N. A. Premium) | प्रस्तावित बांधकाम क्षेत्राकरीता चालू वार्षिक बाजार मूल्य दराच्या १५% | | | | |
| ३. | भोगवटा प्रमाणपत्र | १) विहीत नमुन्यातील अर्ज.<br>२) मंजूर नकाशाची प्रत<br>३) अकृषिक मोजणी नकाशा<br>४) आवश्यक ना- | --------- | --------- | ०८ दिवस | सहायक नियोजनकार (सहायक नगर रचनाकार) | उपमहानगर नियोजनकार (नगर रचनाकार ) | महानगर नियोजनकार |



95

Scanned with CamScanner

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हरकत प्रमाणपत्रे | | | | | | |
| ४. | झोन दाखला | (१) अर्जदार यांनी सादर केलेला अर्ज<br>(२) ७/१२ उतारा | -------- | रु.५००/- प्रति सर्व्हे नं./ गट नं. | ०७ दिवस | सहायक नियोजनकार (सहायक नगर रचनाकार) | उपमहानगर नियोजनकार (नगर रचनाकार | महानगर नियोजनकार |
| ५. | भाग नकाशा/नकाशा देणे | (१) अर्जदार यांनी सादर केलेला अर्ज<br>(२) ७/१२ उतारा | -------- | रु.१०००/- प्रति सर्व्हे नं./ गट नं. | ०३ दिवस | सहायक नियोजनकार (सहायक नगर रचनाकार) | उपमहानगर नियोजनकार (नगर रचनाकार | महानगर नियोजनकार |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
Date: 2023.10.05 17:12:09 +05'30'

( विजय चौधरी )
उप सचिव महाराष्ट्र शासन



Scanned with CamScanner

## जमीन व मालमत्ता विभाग

| अ.क्र | अधिसूचित करावयाच्या लोकसेवांचा तपशिल | आवश्यक कागदपत्र | शुल्क | लोकसेवा पुरविण्यासाठीची कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी पदनाम | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| १. | वाटप भूखंडाचे / गृहयोजनेतील सदनिकांचे हस्तांतरण करणे | (१) फॉर्म नं. १ (नमुन्याप्रमाणे) मुळ मालकाच्या स्वाक्षरीने (हस्तांतरण करुन देणाऱ्यांचे छायाचित्र लावून)<br><br>(२) हस्तांतरण करुन देणाऱ्यांचे पुढीलपैकी कोणतेही एक सध्याचा पत्ता असलेले ओळखपत्र १) निवडणुक ओळखपत्र, २) वाहन चालविण्याचा परवाना, ३) पारपत्र, ४) आधारकार्ड व पॅनकार्ड<br><br>(३) सदनिका / दुकान / दालन ज्यांच्या नावे हस्तांतरण होणार आहे. त्यांची विहित नमुन्यातील अर्जामध्ये संपूर्ण माहिती साक्षांकित छायाचित्रासह.<br><br>(४) मुळ भाडेपट्टा व हस्तांतरण झाले असल्यास हस्तांतरण दस्त यांची प्रत तसेच वाटप प्रमाणपत्र व हस्तांतरण प्रमाणपत्राची प्रत.<br><br>(५) दोघांमध्ये झालेल्या करारनाम्याची कागदपत्रे.<br><br>(६) सोसायटी सभासदांची यादी उपनिबंधक (सहकार) यांनी प्रमाणित केलेल्या प्रतीसह व हस्तांतरणाबाबत सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र / दाखला.<br><br>(७) कर्ज घेतले असल्यास मुळ ना हरकत प्रमाणपत्र व कर्जफेड केलेले वित्तसंस्थेने रजिस्टर | प्राधिकरणाने/ शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले दर | ३० दिवस | उपायुक्त, जमीन व मालमत्ता विभाग | सह आयुक्त, जमीन व मालमत्ता विभाग | अतिरिक्त महानगर आयुक्त |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केलेले प्रत्यंतरण पत्र (डिड ऑफ रिकन्व्हेयन्स ऑफ मॉर्गेज)/ बँकेचे थकबाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र अथवा कर्ज घेतले नसल्यास मूळ मालकाचे प्रतिज्ञापत्र.<br><br>(८) मिळकत भाडेपट्ट्यापासून ५ वर्षांचे आत हस्तांतरण होत असेल तर त्याबाबतची खालीलपैकी लागू असणाऱ्या बाबींशी संबंधित कागदपत्रे<br>अ) कर्जबाजारीपणा / बँकेची जप्ती (बँकेचे प्रमाणपत्र)<br>(ब) भूखंड धारकाचा मृत्यू झाला असल्यास मृत्युचा दाखला.<br>(क) भूखंड धारकाचे वास्तव्यातील बदल (नवीन पत्याचे खरेदीखत, इंडेक्स टु)<br>(ड) कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा गंभीर अपघात किंवा अपंगत्व (अपंगत्वाबाबत सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र)<br>(इ) कुटुंबातील व्यक्तिस गंभीर स्वरुपाचा आजार झाल्यास / अपंगत्व आल्यास (शा.नि.सा.आ.वि. क्र. एमएजी- १०१५/सीआर- ४५/आ.३, दि. ०४/०७/२००० व शा.नि.क्र. एमएजी- २००५/प्र.क्र. २५१/आ.३, दि. १०/०२/२००६ मध्ये नमुद ५ आजारांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे स्वाक्षरीचे वैद्यकीय प्रमाणपत्र) | | | | | |
| २. | वाटप भूखंडावर / गृहयोजनेतील सदनिकांवर वारसनोंद करणे. | (१) वारसाचा एकत्रित अर्ज<br>(२) मृत्युचा साक्षांकित दाखला<br>(३) न्यायालयाच्या वारस दाखल्याची सत्य प्रत<br>(४) भाडेपट्ट्याची साक्षांकित प्रत<br>(५) वारसदारांची साक्षांकित छायाचित्रासह विहित नमुन्यातील माहिती.<br>(६) रु. १०००/- वारस फी चलनाने भरावी.<br>(७) ओळख पत्राची साक्षांकित प्रत उदा. पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना, पासपोर्ट | रु. १०००/- प्रति वारस | १५ दिवस | उपायुक्त, जमीन व मालमत्ता विभाग | सह आयुक्त, जमीन व मालमत्ता विभाग | अतिरिक्त महानगर आयुक्त |
| ३. | वाटप भूखंडावर / गृहयोजनेतील सदनिकांवर कर्जासाठी ना- हरकत प्रमाणपत्र देणे. | (१) नोंदणी झालेल्या भाडेपट्ट्याची / वाटपपत्राची / असाईनमेंट डीड /हस्तांतरण प्रमाणपत्राची प्रत इ.<br>(२) ज्या कारणासाठी कर्ज उभारावयाचे आहे त्याबाबत पुराव्याची साक्षांकित कागदपत्रे सादर करावीत.<br>उदा.<br>अ) बांधकाम परवानगीची प्रत<br>ब) व्यवसाय नोंदणी पुरावा<br>क) परवानाधारक अभियंता किंवा वास्तुविशारद यांचेकडील खर्चाचे प्रमाणपत्र | रु. ५००/- | १५ दिवस | उपायुक्त, जमीन व मालमत्ता विभाग | सह आयुक्त, जमीन व मालमत्ता विभाग | अतिरिक्त महानगर आयुक्त |



Scanned with CamScanner

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ड) पदवी / पदव्युत्तर प्रवेश मिळाल्याचे शैक्षणिक संस्थेचे प्रमाणपत्र<br>इ) शासकीय / शासन मान्य हॉस्पिटलचा आजार व उपचाराच्या खर्चाचा दाखला.<br>(३) मूळ भाडेपट्टाधारक सहकारी संस्था असल्यास सोसायटीचे संमतीपत्र व शेअर सर्टिफेकेट, सभासद यादी, मंजूर नकाशाची प्रत<br>(४) पूर्वीचे वित्त संस्थेचे कर्ज परतफेड केल्याबाबतचे पत्र<br>(५) यापूर्वी दिलेल्या कर्जासाठीचे मुळ ना हरकत प्रमाणपत्र<br>(६) प्रक्रिया शुल्क रु.५००/- भरल्याचे चलनाची प्रत<br>(७) सदर मिळकतीवर कोणतेही कर्ज/बोजा नसल्याचे प्रतिज्ञापत्र ( नमुन्याप्रमाणे) | | | | | |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d2585244352 7f4a3927a849feec29ce263 68b8badbee9e69852545f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58B F87424118BCCD6EE0734058173387O, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2023.10.05 17:12:26 +05'30'

( विजय चौधरी )
उप सचिव महाराष्ट्र शासन



Scanned with CamScanner